पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

मुखपृष्ठ
विजय सैंदाणे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

# विविधांगी ग्रामविकासामध्ये कार्यकारी सोसायट्यांची मौलिक भूमिका



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- ग्रामीण भागातील अर्थकारणाला सोसायटीचा 'बूस्टर डोस'
- राष्ट्रीय तसेच राज्यपातळीवर वित्तसाह्याचे मोठे 'नेटवर्किंग'
- कर्जपुरवठ्याची कार्यकक्षा मात्र अधिक विस्तारण्याची गरज
- राजकीय हेतू बाजूला ठेवून ग्रामोन्नतीकडे लक्ष दिले पाहिजे
- गावाचे संपूर्ण आर्थिक स्वावलंबन साधण्याचे उद्दिष्ट हवे
- व्यापारी हुकूमशाही सहकारातूनच मोडीत काढता येईल
- सोसायटीच्या माध्यमातून 'व्हिलेज नॉलेज सेंटर' सुरू व्हावे

सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्था आणि त्या संस्थांच्या माध्यमातून कृषी व्यवसायाला दिशा देऊन समृध्द करण्याचे काम ग्रामीण भागामध्ये यापूर्वी झालेले आहे. ग्रामीण विकासाची जननी म्हणून सहकार मोठ्या प्रमाणात नावारूपाला आला. देशामध्ये १.७८ लाख सहकारी संस्थांच्या माध्यमातून साखर उद्योग, दुग्ध व्यवसाय, कृषिमालाची विक्री व्यवस्था, प्रक्रिया उद्योगांना वित्तपुरवठा झाल्यामुळे ग्रामीण भागाला बळकटी मिळाली. विशेषत: महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतील सहकारी संस्था आणि त्यांच्या माध्यमातून झालेला ग्रामीण विकास जगातील अनेक देशांना एक दिशा देण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरलेला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. १९५० नंतरच्या कालखंडामध्ये सहकार चळवळीला जास्त वेग आला. या सहकारी संस्थांमधील तळागाळातील सर्वसामान्यांच्या उपयोगी पडणारी आणि शेतकऱ्यांना सर्वार्थाने जवळ असलेली संस्था म्हणजे 'विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी'- जिला ग्रामीण महाराष्ट्रामध्ये 'सोसायटी' म्हणतात ती होय.

आज देशामध्ये एकूण ९२,००० पेक्षा जास्त सोसायट्या असून त्यांच्या

माध्यमातून नऊ कोटी शेतकरी कुटुंबांना फायदा झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये २०,००० सोसायट्या असून, या यंत्रणेने जवळपास महाराष्ट्रातील सर्व खेड्यांतील एक कोटी शेतकऱ्यांना या व्यवस्थेमध्ये सामील करून घेतलेले आहे. देशाचा विचार केला तर प्रत्येक सहा गावांमध्ये एक सोसायटी आहे आणि महाराष्ट्रामध्ये प्रत्येक दोन गावांमध्ये एक सोसायटी आहे. सहकारी संस्था आणि विशेषत: गावपातळीवरील सोसायट्या सक्षम करून त्यांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी त्यांना बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये क्रियाशील ठेवून स्पर्धेला तोंड देण्यासाठी सक्षम करणे, हीच काळाची गरज आहे.

## सर्वसमावेशक कामकाज

विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी या नावातच या संस्थेचे व्यापक कार्य सामावलेले आहे. आज देशामध्ये या सोसायट्यांचे अवाढव्य नेटवर्क उभे आहे. केंद्र व राज्य यांच्या सहकार्याने उभ्या केलेल्या या नेटवर्कचे अनेक उद्देश आहेत. शेतकरी- सभासद यांच्या मदतीने गावामध्येच भांडवल उभे करणे, त्यासाठी त्यांना बचतीची सवय लावून या बचतीमधूनच अडचणीच्या वेळी गरजूंना कर्ज पुरवठा करणे, शेतीसाठी आवश्यक असलेल्या कृषिनिविष्ठा, विविध सेवा- सुविधा यांचा पुरवठा करणे, पिकाच्या उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन तसेच कार्यक्रमांचे आयोजन करणे, कृषिक्षेत्राच्या परिवर्तनासाठी कृषी व कृषिपूरक व्यवसायांची उत्पादनवाढ करण्यासाठी पिकांच्या नवीन वाणांचे बियाणे, दुग्ध व्यवसायासाठी नवीन जाती/संकरित जाती उपलब्ध करुन देणे, पाणी व्यवस्थापन पध्दतीत सुधारणा करणे तसेच सभासदांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक त्या गोष्टींचा अवलंब करणे यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यासाठी गावामध्येच सहकारी तत्त्वावर उभी करण्यात आलेली ही विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी! अर्थात या सर्व बाबी अनेक सोसायट्यांनी सुरुवातीच्या काळात राबविल्यामुळे ग्रामीण समाजाच्या दृष्टीने या सोसायट्या दैवत ठरल्या. सुरुवातीच्या काळात अनेक सोसायट्यांची आर्थिक स्थिती उत्तम होती. मात्र पुढे दुर्दैवाने समाजकारणापासून अलिप्त होत गेल्याने अनिष्ट राजकारणाचा शिरकाव या सोसायट्यांमध्ये झाला आणि त्यानंतरच सोसायट्यांच्या अध:पतनाला सुरुवात झाली.

## संस्थांना लागली उतरती कळा

१९८० च्या दशकापर्यंत सोसायट्यांची परिस्थिती चांगली होती. नंतर सोसायटीच्या कार्यपध्दतीमध्ये बदल होत जाऊन या सोसायट्या फक्त कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था झाल्या. अनिष्ट राजकारणामुळे अनेक ठिकाणी सभासदांचा विश्वास कमी होऊ लागला तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रमांपासून दूर गेलेल्या सोसायट्या तोट्यात येऊ लागल्या. सभासदांच्या भांडवलाचा आटलेला ओघ, स्वभांडवलामध्ये होणारी घट यामुळे या सोसायट्या वित्तपुरवठा करण्याच्या बाबतीत पूर्णपणे परावलंबी होत गेल्या. आज देशाचा विचार केला तर सोसायटीमार्फत करण्यात येत असलेल्या वित्तपुरवठा फक्त २६.९ टक्के इतका आहे. सोसायटीची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस जास्त प्रमाणात बिघडत गेली. सुरुवातीला परिस्थिती चांगली होती. आज या सोसायट्यांकडे फक्त शेतीला कर्ज देणारी संस्था म्हणून बघितले जाते आणि जी संस्था कमी स्वभांडवल आणि जास्त बाह्य कर्ज उभारून इतरांना कर्ज देऊन कमिशनवर चालते, ती संस्था आपले स्वत:चे अस्तित्त्व टिकविण्यासाठी सक्षम असूच शकत नाही. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, स्पर्धेचे युग या विषयांवर चर्चा होत असताना गावपातळीवरील या सोसायट्यांना स्पर्धेत उतरविण्यासाठी सोसायट्यांच्या दृष्टिकोनात बदल करावा लागणार आहे. सहकारी सोसायट्यांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी शेती कर्जपुरवठ्याबरोबरच ज्या उद्देशाने त्यांची निर्मिती केली आहे त्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. जागतिक खुल्या अर्थव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या गरजा बदललेल्या आहेत आणि शेतकऱ्यांना या जागतिक स्पर्धेत सक्षमपणे साथ देण्यासाठी सोसायट्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कर्जाबरोबरच विविध सेवा, सुविधा, सल्ला देण्याची जबाबदारी सोसायट्यांनी घेतली पाहिजे. सोसायट्यांच्या कार्यक्षेत्राचा विचार करून, कार्यक्षेत्राचा सर्व्हे करून शेतकऱ्यांच्या गरजा ओळखणे आणि

गरजेनुसार विकासाचा कृती कार्यक्रम करुन त्यानुसार अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. सोसायट्या जिरायत भागातील असोत वा बागायत भागातील, प्रत्येक भागातील गरजांनुसारच सोसायट्यांनी कृती कार्यक्रम तयार करण्याची गरज आहे. अशा कृती कार्यक्रमाद्वारे उपलब्ध साधनसामग्रीनुसार पिकाची निवड, उत्पादकता वाढ, गुणवत्ता वाढ, शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, शेतीमालाची साठवणूक, ग्रेडिंग, पॅकिंग, वाहतूक, शेती व शेतकऱ्याचा विमा, व्हिलेज नॉलेज सेंटर, ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, सहकारी- कंत्राटी शेतीचा अवलंब, बचत गट, शेतकरी युवक गट स्थापना, अपारंपरिक क्षेत्रातील उर्जा निर्मिती या सारख्या अनेक संकल्पना राबवून सहकारी सोसायट्या गावातील विकासाचा केंद्रबिंदू ठरल्या पाहिजेत. अर्थात यासाठी योग्य मार्गदर्शन आणि नियोजन करून समाजकारणासाठी सोसायटी हाच मुख्य उद्धेश ठेवून ग्रामीण युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

## शासनाची सकारात्मक भूमिका

देश प्रगतीकडे वाटचाल करत असताना सहकारी सोसायट्या अधोगतीकडे जात आहेत आणि त्यांना आधार देण्यासाठी सरकारचा प्रयत्न सुरू आहे. सहकारी सोसायट्यांच्या अध:पतनाचे मुख्य कारण म्हणजे मुळातील कार्य विविधतेपासून दूर जाऊन वाढलेला राजकारणाचा मोठा हस्तक्षेप! सोसायट्यांच्या माध्यमातून अनेक चांगले उपक्रम राबविता येतात हे यापूर्वी अनेक सोसायट्यांनी दाखविलेले आहे आणि आजही काही सोसायट्या अनेक प्रयोग करत आहेत. शेतकरी आज अशाश्वत जीवन जगत आहे. कमी उत्पादकता, अशाश्वत बाजारभाव, उत्पादन खर्चात होणारी भरमसाठ वाढ याबरोबरच अनिश्चित हवामानामुळे आज शेती आतबट्ट्याची झालेली आहे. या अशाश्वत व्यवसायाला काही प्रमाणात शाश्वती देण्यासाठी कृषी विमासारख्या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात अवलंब शेती क्षेत्रामध्ये होणे गरजेचे आहे. हवामानातील बदलांवर आधारित कृषी विमा ही संकल्पना घेऊन विमा क्षेत्रात सहकारी सोसायट्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. कर्जदार शेतकऱ्याबरोबर बिगर कर्जदार शेतकऱ्यांनाही या योजनेत समाविष्ट करून घेतले पाहिजे. तसेच हवामानाची नोंद ठेवण्यासाठी गरजेनुसार हवामान नोंदणी केंद्राची स्थापना करून विमा नुकसान भरपाईमध्ये पारदर्शकता ठेवण्यामध्येही सोसायट्यांचा मोलाचा वाटा असू शकतो. आज अनेक कंपन्या प्रक्रिया उद्योगासाठी, निर्यातीसाठी किंवा देशांतर्गत विक्रीसाठी करार पध्दतीच्या शेतीचा प्रसार करत आहेत. तसेच काही राज्यांमध्ये सहकारी तत्त्वावर शेती करून, एकत्रित शेतीमाल तयार करून त्यापासून फायदा मिळवत आहेत. करार शेती करण्यासाठी कंपन्यांना त्यांची यंत्रणा मोठ्या प्रमाणात राबवावी लागते. पिकानुसार परिसराची निवड, शेतकऱ्याची निवड, पीक उत्पादन तंत्रज्ञान देणे, कृषी निविष्ठा- सेवासुविधा देणे, वाहतूक, विमा, कर्जपुरवठा यासाठी खासगी कंपन्यांना विविध संस्थांची मदत घ्यावी लागते. त्यामध्ये सहकारी सोसायट्यांनी पुढाकार घेतला तर त्या कंपनी आणि शेतकऱ्यांमधील एक सक्षम दुवा होऊ शकतात. यापासून सोसायट्यांना अधिक फायदा होऊन त्यांचे सक्षमीकरण होऊ शकते.

## शेतीमाल प्रक्रियेसाठी पुढाकार हवा

शेतीमालाच्या एकूण उत्पादनापैकी फक्त २ टक्के शेतीमालावर प्रक्रिया केली जाते तर ७ टक्के शेतीमालावरचे मूल्यवर्धन केले जाते. ग्रामीण पातळीवर प्रक्रिया आणि मूल्यवर्धन करण्याच्या सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतीमालाचे, पर्यायाने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. शेतीमालावर प्राथमिक पातळीवर प्रक्रिया किंवा मूल्यवर्धन करुन शहरी भागातील मोठ्या कंपन्यांना या मालाचा पुरवठा केल्यास या उद्योगाला गती मिळू शकेल. अर्थात हे काम एकटा शेतकरी करू शकत नाही. त्यासाठी सामुदायिक प्रयत्नांची गरज आहे. साठवणूक व्यवस्था, ग्रेडिंग, पॅकिंग, कोल्ड स्टोअरेज, वाहतूक व्यवस्था आणि अर्थपुरवठा यासाठी सोसायट्या आपले योगदान देऊ शकतात. यामधून ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधीही वाढतील. गावामध्ये तयार होणारी विविध फळे- भाजीपाला यांच्या उत्पादनाचा विचार करून मल्टीपर्पज प्रोसेसिंग युनिटची सुरुवात होऊ शकते. यातून तालुका किंवा जिल्ह्यातील विविध पिकांचे काही क्लस्टर्स उभे राहू शकतात. अशा क्लस्टर्सचे नेटवर्क

तयार होऊन त्या भागातील सोसायट्यांचे मोठे जाळे निर्माण होऊ शकते. या संकल्पनेद्वारे मागणीनुसार उत्पादन काढण्याची तसेच पुरवठा करण्याची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकते. विज्ञानाच्या युगात ज्ञानाला मोठे महत्त्व आहे. ग्रामीण भागातील समाज जोपर्यंत पूर्ण ज्ञानसंपन्न होत नाही तोपर्यंत देशाच्या विकासाचा दर वाढविणे शक्य नाही. आधुनिक शेतीचे ज्ञान, मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धा करण्याचे ज्ञान, नवनवीन संकल्पना राबविण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले ज्ञान, बाजारभावातील बदलांचे ज्ञान, हवामानातील बदलांनुसार शेती करायचे ज्ञान आणि एकूणच जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आज प्रत्येक शेतकऱ्याकडे असले तरच तो शाश्वत जीवन जगू शकतो. सोसायट्यांच्या माध्यमातून व्हिलेज नॉलेज सेंटरची संकल्पना प्रत्यक्षात पुढे येऊ शकते. व्हिलेज नॉलेज सेंटर सोसायटीमध्येच कार्यान्वित करण्यासाठी गावातीलच तरुणांना प्रोत्साहित करून त्यांनाही रोजगार देता येईल, तसेच सोसायट्यांचेही नेटवर्क याद्वारे वाढवून त्यांची एकूणच कार्यक्षमता वाढविण्यासाठी मदत होईल.

## विविध कारणांसाठी वित्तपुरवठा आवश्यक

आज शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे, खते, औषधे उपलब्ध होत नाहीत. खासगी व्यापाऱ्यांकडून फसवणूक होऊनही पर्याय नसल्यामुळे त्यांच्याकडेच जावे लागते. खासगी क्षेत्रातील ही एकाधिकार पध्दत मोडण्यासाठी सोसायट्या पुढे येऊ शकतात. दर्जेदार खते, औषधे, उत्तम बियाणे, पाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेले साहित्य, शेती औजारे सोसायटीद्वारे उपलब्ध करून दिली तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. गावामध्येच बीजोत्पादन घेऊन त्यावर प्राथमिक प्रक्रिया करून ते परत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी 'सीड व्हिलेज'सारखी संकल्पनाही सोसायटीमार्फत राबविता येईल. वित्त पुरवठा हा सोसायटीचा आज मुख्य उद्देश असला तरी त्यांचा सर्वांत जास्त वित्तपुरवठा फक्त पीक कर्जासाठी (अल्प मुदतीचा) आहे. सोसायटीमार्फत देण्यात येणारे कर्ज आजही पारंपरिक पध्दतीने तसेच एका साचेबध्द पध्दतीने देण्यात येते. यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होण्याची गरज आहे.

आज कोणताही व्यवसाय, मग तो खासगी क्षेत्रातील असो की सरकारी क्षेत्रातील; त्यामध्ये विविधता असणे फार महत्त्वाचे आहे. सोसायटीद्वारे वित्तपुरवठ्यामध्ये जोपर्यंत विविधता येत नाही तोपर्यंत सोसायट्या वित्तपुरवठ्याद्वारे सक्षम होऊ शकत नाहीत. पीक कर्जासाठी अल्प मुदतीच्या कर्जाबरोबर मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या पुरवठ्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. तसेच शेतीपूरक व्यवसाय, बिगर कृषी व्यवसाय तसेच स्वयंरोजगारासाठी उपयुक्त असलेल्या कोणत्याही व्यवसायाला वित्तपुरवठा करण्यासाठीही सोसायट्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. जागतिक बदलाला अनुसरुन सोसायट्यांमध्ये आवश्यक तो बदल झालेला नाही. हा बदल होण्यासाठी सोसायटी ही राजकारणाचा अड्डा नसून विकासाचे केंद्र आहे, ही मानसिकता दृढ होणे गरजेचे आहे. ज्यांना जगातील विकासाचे आकलन आहे, ज्ञान आहे त्यांनीच सोसायटीच्या विकास प्रक्रियेमध्ये सहभागी झाले पाहिजे. सोसायटी आणि गाव सक्षम आणि स्वावलंबी व्हावे ही राजकारणी, उद्योजक आणि इतरांना कधीही न आवडणारी बाब आहे. त्यामुळे आपापसात भांडणे लावून गाव आणि सोसायटीमध्ये राजकारण करून गावातच भांडणे लावून देण्याचे काम सुरु राहिले आहे. यावर उपाय म्हणून यापुढील काळात शेती, शेतकरी आणि एकूणच ग्रामीण समाज यांच्या प्रगतीसाठी, शाश्वत जीवनासाठी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी हे एक 'विकासकेंद्र' म्हणून प्रस्थापित करणे हीच काळाची गरज आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक– ४२२०१३ येथे प्रकाशित केले.
संपादक : डॉ. भास्कर गायकवाड
* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.